प्रभात

Date: 13 February, 2010

Edition: Pune

Page No.: 12

# आयपीएल सामन्यांचे चित्रपटगृहांमध्ये थेट प्रक्षेपण

पुणे, दि. १२- जगातील सर्वात मोठे डिजिटल सॅटेलाईट सिनेमा नेटवर्क असलेल्या यूएफओ मूव्हीजतर्फे डीएलएफ आयपीएल स्पर्धेतील सामन्यांचा आनंद लुटण्यासाठी क्रिकेटशौकिनांना एक नवा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे.

येत्या १२ मार्च रोजी सुरू होत असलेल्या या स्पर्धेतील सामन्यांचे थेट प्रक्षेपण देशभरातील मल्टिप्लेक्स, तसेच एक पडदा असलेल्या चित्रपटगृहांमधून उच्च दर्जाच्या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने व जाहिरातींशिवाय करण्यात येणार आहे. यासाठी चित्रपटगृहांमध्ये क्रिकेटचे वातावरण निर्माण करण्यात येणार आहे. विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल, आकर्षक भेटवस्तू आणि क्रिकेटशी संबंधित विक्री उत्पादने ही या उपक्रमाची अन्य वैशिष्ट्ये असतील.

आतापर्यंत यूएफओने ५५० चित्रपटगृहांशी करार केले असून त्यातील २२ मल्टिप्लेक्स आहेत. महाराष्ट्र व गोवा विभागातील २२० चित्रपटगृहांशी याआधीच करार झाले असून पुण्यातील आयनॉक्स व फेम या मल्टिप्लेक्समध्ये, तसेच विजय व वैभव या एकपडदा चित्रपटगृहांमध्ये ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.